बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३५७ । वार गुरूवार दि १८ सप्टेंबर एएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 357 thusday 18 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# सत्याची बाजू मांडणारा आणि भ्रष्टाचाराला थेट भिडणारा

# सायं.दै महाराष्ट्र आरंभ'वर शुभेच्छांचा वर्षाव...



सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
● संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४




# दुसऱ्या वर्धापन दिनाला मान्यवरांचा आणि वाचकांचा गगनभेदी प्रतिसाद; अन्यायाला सडेतोड भिडणाऱ्या निर्भीड पत्रकारितेचा विजय!

## आलेल्या सर्व मान्यवरांनी, वाचकांनी आणि हितचिंतकांनी दिलेला आशिर्वाद आमच्या लेखणीला बळ : संपादक

**विशेष । संपादक**

जनतेचा आवाज, अन्यायाविरोधात ठाम भूमिका, निर्भीड लेखणी आणि सडेतोड वृत्तांकन यामुळे अवघ्या दोन वर्षांत वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे निर्भीड, निडर आणि जनतेचा आवाज बनलेलं सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ आपल्या यशस्वी वाटचालीची दोन वर्षे पूर्ण करत असताना वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या दैनिकाच्या दुसऱ्या वर्धापन दिन सोहळ्यास मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील मान्यवर, पोलीस, वकील डॉक्टर, वाचक, हितचिंतक व पत्रकारिता क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

वर्धापन दिनाच्या निमित्ताने दि.१७ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात दैनिक महाराष्ट्र आरंभ ने घेतलेली ध्येयवादी भूमिका, सडेतोड वृत्तांकन आणि निर्भीड लेखणीचे सर्वत्र कौतुक झाले. खासदार, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकारिता क्षेत्रातील जाणकार, वाचक व समर्थक यांनी उपस्थित राहून दैनिक महाराष्ट्र आरंभ परिवारावर शुभेच्छांचा वर्षाव केला. कार्यक्रमात दैनिक महाराष्ट्र आरंभ ने दोन वर्षांत घडवलेले यश, समाजातील वंचित व शोषित घटकांसाठी लढवलेले लढे, भ्रष्टाचार आणि अन्यायाविरोधात उभा केलेला आवाज याची दखल घेऊन विविध मान्यवरांनी आरंभ च्या कामगिरीचे कौतुक केले. लोकशाहीचा खरा चौथास्तंभ म्हणजेच निर्भीड पत्रकारिता, आणि ती धाडसी भूमिका महाराष्ट्र आरंभ ने सिद्ध केली आहे, अशा शब्दांत उपस्थित मान्यवरांनी गौरव केला.

या सोहळ्यात वाचकांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला वेगळेच वैशिष्ट्य प्राप्त झाले. वाचकांनी दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या लेखणीवर दाखवलेला विश्वास, दिलेला प्रतिसाद आणि केलेले कौतुक हेच आरंभ च्या यशामागचे मोठे बळ असल्याचे संपादक मंडळाने व्यक्त केले. या दोन वर्षांच्या वाटचालीत महाराष्ट्र आरंभ ने न विकता, न झुकता आणि न थांबता सत्याची बाजू मांडत सातत्याने समाजहिताची धुरा सांभाळली आहे. पुढील काळातही हे वृत्तपत्र त्याच ध्येयाने काम करत राहील, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली. निर्भीड पत्रकारितेला दिलेला वाचकांचा अभूतपूर्व प्रतिसाद आणि मान्यवरांच्या शुभेच्छांचा वर्षाव यामुळे दुसरा वर्धापन दिन सोहळा अविस्मरणीय ठरला आहे. कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी ठामपणे सांगितले की, दैनिक महाराष्ट्र आरंभ हे केवळ वृत्तपत्र नाही तर जनतेचे व्यासपीठ आहे. दोन वर्षांत विकला नाही, झुकला नाही, थांबला नाही. उलट सत्यासाठी लढणाऱ्या या दैनिकाने खऱ्या अर्थाने लोकशाहीचा चौथास्तंभ सिद्ध केला आहे. महाराष्ट्र आरंभ ने समाजातील वंचित घटकांचे प्रश्न मांडले, भ्रष्टाचाराला थेट भिडले, प्रशासन व सत्ताधाऱ्यांना जागं केलं. या कामगिरीमुळे वाचकांचा प्रतिसाद वाढत गेला आणि आज आरंभ चा प्रत्येक अंक लोकांच्या विश्वासाचा दस्तऐवज ठरला आहे. वाचकांच्या प्रेमाचा, मान्यवरांच्या आशीर्वादाचा आणि समाजातील प्रत्येक घटकाच्या विश्वासाचा आधार घेऊन दैनिक महाराष्ट्र आरंभ ची वाटचाल आता अधिक ताकदीने पुढे सुरू राहील, अशी ग्वाही संपादक मंडळाने यावेळी दिली. दुसऱ्या वर्धापन दिनी मिळालेला प्रचंड प्रतिसाद हा फक्त उत्सव नाही. तर निर्भीड पत्रकारितेला मिळालेला विजय आहे.

### वाचकांच्या आणि मान्यवरांच्या विश्वासाने सत्तेला थरथरवणारी निर्भीड लेखणी; आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार

वाचकांच्या अपार प्रेमाने आणि मान्यवरांच्या शुभेच्छांच्या वर्षावाने सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ आज अधिक भक्कम आणि ताकदीचा झाला आहे. अवघ्या दोन वर्षांत सत्यासाठी पेटलेली लेखणी, अन्यायाविरोधात उभा ठाकलेला आवाज आणि सडेतोड पत्रकारितेची भूमिका यामुळे महाराष्ट्र आरंभ जनतेचा खरा आवाज बनला आहे. दुसऱ्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने संपादक मंडळाने ठामपणे सांगितले की, महाराष्ट्र आरंभ विकला जाणार नाही, झुकणार नाही, थांबणार नाही. यापुढेही अन्याय, अत्याचार आणि भ्रष्टाचाराविरोधात ही निर्भीड आणि सडेतोड लेखणी तितक्याच ताकदीने चालू राहील. सत्ताधाऱ्यांना धडकी भरवणारा आवाज आणि वंचितांच्या हक्कासाठी निर्भीड भूमिका घेणारे हे आरंभ वाचकांच्या विश्वासाच्या आधारावर अधिकच शक्तिशाली झाले आहे. वाचकांनी दाखवलेला विश्वास, मान्यवरांनी दिलेला आशीर्वाद आणि समाजातील प्रत्येक घटकाने दाखवलेला आधार हेच पुढील लढ्याचं शस्त्र आहे. सत्यासाठीची ही झुंज थांबणार नाही, महाराष्ट्र आरंभची निर्भीड लेखणी अधिक धारदार होत राहील, एवढं मात्र निश्चित.











सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
चा
अन्याय अत्याचार भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ..!


सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
चा


आरंभ
चा


सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
चा


सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
चा


सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
चा


सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
चा


सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ


सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
चा


सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
चा
















२ वर्धापन























हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT